## निशणी कमांक ०६ वर आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज धनको (डी.एच) च्या वतीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ प्रमाणे दरखास्त (नि.क्र. १) दुरूस्तीसाठी अर्ज केला आहे.

२. धनको (डी.एच) च्या अर्जातील कथन असे आहे की, प्रस्तुत प्रकरण धनको (डी.एच) याने ऋनको(जे.डी.) विरुध्द हुकूमनाम्यानुसार स्वत्रंट वाटणी व ताबा मिळणेकरीता केलेला आहे. सदर प्रकरणातील ऋनको(जे.डी.) क्र. १ ते ६, ८ व ९ यांचे अडनाव ''तिडके'' असे आहे परंतु नजरचुकीने ''तिकडे'' असे टायपिंग चुकीचे झाली आहे. सदरची चुक नजरचुकीने झाली असुन ती नाममात्र आहे. सबब, ''तिकडे'' ऐवजी ''तिडके'' असे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

३ ऋनको(जे.डी.) अदयाप प्रकरणामध्ये हजर न झाल्यामुळे त्याचे म्हणणे अभिलेखावर नाही.

४ खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणेः-

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित दुरूस्तीस परवानगी देणे योग्य आहे का? | होय. |
| २. | आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

### का र ण मि मां सा

**मुद्दे क.१ व २:-**

५ धनको (डी.एच) चे वतीने त्यांचे विधीज्ञ यांनी युक्तिवाद केला. त्यांनी त्यांच्या अर्ज व म्हणणे यामधील कथनानुसार युक्तिवादात प्रतिपादन केले.

६ प्रस्तुत दरखास्त ही नियमित दिवाणी दावा क्र. २४/२०१२ मध्ये दिनांक १८/०९/२०२१ आदेशानुसार दाखल करण्यात आलेली आहे. धनको (डी.एच) याने ऋनको(जे.डी.) विरुध्द हुकूमनाम्यानुसार स्वत्रंट वाटणी व ताबा मिळणेकरीता केलेला आहे. सदर प्रकरणातील ऋनको(जे.डी.) क्र. १ ते ६, ८ व ९ यांचे अडनाव तिडके असे आहे परंतु नजरचुकीने तिकडे असे टायपिंग चुकीचे झाले आहे व सदरची चुक नजरचुकीने झाली असल्याचे दिसुन येते कारण नि.क्र. ०४ सोबत दाखल मुळ दावा निकाल व हुकुमनामा याचा प्रमाणित प्रतीमध्ये सदर ऋनको(जे.डी.) चे अडनाव हे तिडके असल्याचे दिसुन येते. सदर दुरूस्तीमुळे दरखास्तच्या मुळ स्वरूपात कोणताही आमुलाग्र असा बदल होत नाही. ऋनको (जे.डी.) हे अदयाप सदर दरखास्तमध्ये हजर झालेले नाहीत तसेच, सदर दुरुस्तीमुळे ऋनको(जे.डी.) यांचे अपरिमीत असे हानी होईल असेही दिसून येत नाही. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असल्याने दुरुस्तीस परवानगी देणे योग्य होईल. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## **आ दे श**

१. धनको (डी.एच) चा नि.०६ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे धनको (डी.एच) ला दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. सदरची दुरुस्ती धनको(डी.एच) ने विहित मुदतीत करावी व दुरुस्त प्रत सादर करावी.

४. सदर अर्जाचा खर्च धनकोवर असे.

SHARAD NARAYAN GAVALI
Digitally signed by SHARAD NARAYAN GAVALI

दिनांक:- २४.०९.२०२२

**(शरद ना. गवळी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
रिसोड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same word to word, as per the original **Order.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | **Rohan S. Koshti (L.G.)** |
| Name of court | : | Jt.C.J.J.D.& JMFC, Risod. |
| Date | : | 24.06.2022 |
| Order signed by the Presiding Officer | : | 24.06.2022 |
| **Order uploaded on** | **:** | **26.06.2022** |